अत्यंत महत्वाचे/कालमर्यादा

जा.क्र.शावैमअ/विवि/ 4029 /२०२०
अधिष्ठाता यांचे कार्यालय,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला.
दिनांकः 2 /६/२०२०

# पदवीपुर्व व पदव्युत्तर या वैद्यकीय महाविद्यालयातील उन्हाळी-२०२० लेखी व प्रात्याक्षिक परीक्षेस बसणा-या विद्यार्थ्यांकरीता सुचना.

*विद्यापीठाचे कार्यालयीन परिपत्रक*

या वैद्यकीय महाविद्यालयातील उन्हाळी-२०२० लेखी व प्रात्याक्षिक परीक्षेस बसणा-या विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, विद्यापीठाचे कार्यालयीन परिपत्रक महाविद्यालयास प्राप्त झालेले असून विद्यापीठाकडून उन्हाळी २०२० लेखी व प्रात्याक्षेचे आयोजन करण्यात येत असून सदरील परिक्षा टप्प्या टप्याने घेण्यात येतील व सदरील अभ्यासक्रमाचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येतील.

तसेच उपरोक्त लेखी व प्रात्याक्षिक परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या स्थानिक गावानजिकच्या त्या त्या अभ्यासक्रमाच्या परीक्षा केंद्रावर (त्या ठिकाणी परीक्षा केंद्र उपलब्ध असल्यास) लेखी व प्रात्याक्षिक परीक्षा केंद्र बदली देण्याची सोय विद्यापीठाकडून उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच परीक्षा केंद्राची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

तरी उन्हाळी २०२० परीक्षेकरीता ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्र बदलुन घ्यावयाचे आहे अशा विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या कार्यालयीन परिपत्रक क्रं. २९८४/२०२० दि. ०५.०६.२०२० रोजीचे सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये अर्ज आवश्यक त्या प्रमाणपत्रासोबत दि.११.०६.२०२० रोजी ४.०० वाजेपर्यंत, महाविद्यालयाच्या ईमेल आयडीवर (ugpgexamsummer2020@gmail.com) वर पाठविण्यात यावा. व आपला अर्ज महाविद्यालयास प्राप्त झाल्याची खातरजमा करण्यात यावी. जेणे करुन काही त्रुटी असल्यास त्रुटी पुर्तता पुर्ण करणे सोईचे होईल. उशिरा प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार होणार नाही याची संबधितांनी नोंद घ्यावी.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अकोला.

प्रति,
१) सर्व संबधित विभाग सुचनाफलक.
२) महाविद्यालय सुचना फलक,
३) मुलांचे व मुलींचे वसतीगृह १, २ व ३ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला.
४) ग्रंथालय विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला.

(३) अंतर्गत : सर्व विद्याशाखा प्रमुख, (पदवी व पदव्युत्तर)



# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक

प्रति,
मा. परीक्षा नियंत्रक
मआविवि, नाशिक

विषय : विद्यापीठ उन्हाळी-२०२० लेखी परीक्षेस स्थानिक गावानजीकचे परीक्षाकेंद्र मिळणेबाबत...

मा. महोदय,

मी ........................................................ महाविद्यालय .......................... ............................ अभ्यासक्रम (Course) ............................. वर्ष (Year)............. भ्रमणध्वनी क्र. ................. ई-मेल आयडी ..........................................विद्यापीठाच्या लेखी आणि प्रात्यक्षिक परीक्षा केंद्र बदलून मिळणेसाठी विनंती अर्ज करतो/करते की, मला उन्हाळी-२०२० लेखी परीक्षेसाठी कोरोना (कोव्हिड-१९) विषाणूंच्या प्रादूर्भावामुळे एक वेळेची विशेष बाब म्हणून विद्यापीठामार्फत उपलब्ध करुन दिलेल्या माझ्या अभ्यासक्रमाच्या विद्याशाखांच्या परीक्षाकेंद्र पर्यायांन्वये खालील शहर/गावापैकी परीक्षाकेंद्र दिल्यास मी आपला/आपली आभारी असेल.

शहर/गांव (केंद्रासाठी) अपेक्षित

१. ....................
२. ....................
३. ....................

} कृपया फक्त शहर/गावाचे नाव नमूद करावे.

माझ्या पालकांचे निवासी शहर/गांव उपरोक्त ३ पर्यायांपैकी असल्याचे प्रमाणित करण्यासाठी सोबत दस्तावेज (आधारकार्ड/रेशनकार्ड/................................) जोडले आहे.

उपरोक्त दिलेली माहिती खरी असून त्याप्रमाणे विनंती करण्यात येत आहे. तरी कृपया माझ्या अर्जाचा सकारात्मकतेने विचार करावा ही विनंती. प्रशासकीय कारणास्तव माझी विनंती अमान्य होवू शकते किंवा उपरोक्त ३ पैकी कोणत्याही शहर/गावांत परीक्षा केंद्र मिळू शकते याची मला जाणीव आहे. तसेच उक्त ३ पैकी केंद्र न मिळाल्यास माझ्या स्वतःच्या महाविद्यालयात परीक्षा केंद्र असेल याची मला जाणीव आहे.

धन्यवाद.

परीक्षार्थीची स्वाक्षरी

सही व महाविद्यालयाचा शिक्का
अधिष्ठाता/प्राचार्य/संचालक